महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एम.सी.ई.डी.)
आयएसओ ९००१:२०१५ मानांकन प्राप्त मॅक्सेल आणि SKOCH पुरस्कार विजेती संस्था
उद्योग संचालनालय अंतर्गत कार्यरत व महाराष्ट्र शासन पुरस्कृत स्वायत्त प्रशिक्षण संस्था
MCED
मासिक उद्योजक

प्रति,

दि. 12-08-2022

मा.प्राचार्य साहेब, / संचालक साहेब
व्यवस्थापन शास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब ~~बाबा~~ आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.
औरंगाबाद.

विषय :- माहिती पत्रक नोटीस बोर्डवर लावण्यास परवानगी मिळणेबाबत.....

महोदय,

वरील विषयांन्वये महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एम.सी.ई.डी.) आयोजीत व बार्टी (पुणे) ,पुरस्कृत २ महिने कालावधीचे उच्च दर्जाचे (HIGH TECH) तांत्रीक प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. या प्रशिक्षणाचे माहिती पत्रक आपल्या महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यास परवानगी मिळावी हि विनंती.

Department of Management Science, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
INWARD
No. 63
Date 12/08/2022

धन्यवाद

Permitted
12/8/2022

आपली विश्वासु

Rnimkar

सौ. प्रतिभा निमकर,
जिल्हा प्रकल्प समन्वयक,
एम.सी.ई.डी., औरंगाबाद

मुख्य कार्यालय : अ-३८, एम.आय.डी.सी. परिसर, रेल्वे स्टेशन जवळ, पोस्ट बॉक्स नं. ५४६, औरंगाबाद - ४३१००५ (म.रा.)
दूरध्वनी : कार्यालय : (०२४०) २३३२५६३, २३३२५८७
Portal : www.mced.co.in E-mail : executivedirectormced2@gmail.com

MCED



barti

# MAHARASHTRA CENTRE FOR ENTREPRENEURSHIP DEVELOPMENT (MCED)

## DR.BABASAHEB AMBEDKAR RESEARCH & TRAINING INSTITUTE (BARTI) PUNE (SPONSORED)

"Announcing Training Programme on INDUSTRIES 4.0 or on Following Trades (FREE / निशुल्क:)

## HIGH TECH ENTREPRENEURSHIP DEVELOPMENT PROGRAMME (HIGH TECH EDP) (NON RESIDENTIAL) (For Schedulled Caste Category)

| Sr.No. | Name Of Course / Training | Duration | Required Education | Contact Person |
|---|---|---|---|---|
| 01 | CLOUD COMPUTING SERVICES & SYSTEM ADMINSTRATION & BASIC JAPANESE | 23.08.2022 To 21.10.2022 (60 Days) | BE., B. Tech, MCA in Computer Sci. & Engg. IT Comp. Tech, Mech, Ind, Elect, Electronic, Instru, Civil Engg. M.Sc in Math, Physics, IT. | Mrs. Aasha Kurwade<br>Programme Co-ordinator<br>Mob. - 7888070419 |

**Interested Candidate Attended ONE DAY ENTREPRENEURSHIP CAMP (EAP) & Submitted Registration Form Along With All Documentations (Application Form, Caste Certificate, Aadhar Card, Leaving Certificate, Mark Sheet & 2 Passport Photo)**

**ONE DAY INFORMATION CAMP (EAP) : Date - 18/08/2022 Time - 12.00 pm To 3.00 pm**

**Venue - MCED, Head Office, A-38, Near Railway Station Road, MIDC Area, Aurangabad**

## For More Information

**Mrs.Pratibha Nimkar**
District Project Co-ordinator,
MCED, Aurangabad
Mob. - 9028056800

**Yogesh Sonawane**
Project Officer,
BARTI, Aurangabad

**Mr.D.U.Thaware**
Regional Officer,
MCED, Aurangabad

**Dhammajyoti Gajbhiye (IPoS)**
Director General
BARTI, Pune

**MCED, Head Office, Plot No.38, MIDC Area, Railway Station Road, Aurangabad**

Email id - aurangabaddpcmced@gmail.com

Website-www.mced.co.in

शनिवार 7 जानेवारी 2023

# युवा-शिक्षण-रोजगार

दिव्य मराठी • औरंगाबाद, शनिवार, ७ जानेवारी २०२३

## विद्यापीठात आज 'प्रशिक्षण आणि विकास' कार्यशाळा

**औरंगाबाद** | विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र विभागात ६ ते ९ जानेवारीदरम्यान रुबीकॉन फाउंडेशनमार्फत तीनदिवसीय 'प्रशिक्षण व विकास' विषयावर कार्यशाळा होत आहे. विभागप्रमुख डॉ. फारुख खान यांनी उद्घाटन केले. शिवानी गोयल आणि सुदर्शन भालेराव यांनी शुक्रवारी व्याख्यान दिले. शनिवारी सकाळी ९.३० वाजता पुन्हा त्यांचे व्यख्यान होणार आहे. ज्ञानेश्वर गिरी, आनंद शिरसाठ, अना खान, स्नेहल उमाटे, उत्कर्षा देहाडे, शिफा खान, सौरभ शेजूळ आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

बुधवार 11 जनवरी 2023

लोकमत समाचार

# 'डॉ कलाम ने बढ़ाया भारतीयों का आत्मविश्वास'

लोकमत समाचार सेवा

औरंगाबाद. 'भारत रत्न डॉ एपीजे अब्दुल कलाम ने रक्षा क्षेत्र में जो योगदान दिया है, वह हमेशा याद रहेगा. उन्होंने देश के प्रत्येक नागरिक को भारत की महासत्ता का सपना दिखाकर उनका आत्मविश्वास बढ़ाया है'.

यह बात 'डीआरडीओ' के पूर्व संचालक-गन एक्सपर्ट काशीनाथ देवधर ने कही. मंगलवार को डॉ बाबासाहब आंबेडकर मराठवाड़ा विवि के प्रबंधन शास्त्र विभाग में विद्यार्थियों से सीधा संवाद करते हुए उन्होंने कहा कि, जिस समय कारगिल युद्ध हुआ, उस वक्त उनकी टीम का नेतृत्व भारत के तत्कालीन राष्ट्रपति डॉ एपीजे अब्दुल कलाम कर रहे थे. उन्होंने डॉ कलाम की बेहतर नेतृत्व क्षमता पर विस्तार से अपनी बात रखी. इसके साथ ही पूर्व संचालक देवधर ने उनके जीवन के अनेक प्रसंगों पर प्रकाश डाला. जानकारी के अनुसार भारतीय जवानों द्वारा बजुका नामक जिस गन का इस्तेमाल किया जाता है, शुरुआत में उसका वजन 26 किलो था, जिसे कम कर 14 किलो करने का कार्य गन एक्सपर्ट काशीनाथ देवधर व उनकी टीम ने किया था.



औरंगाबाद में विवि के प्रबंधन शास्त्र विभाग में विद्यार्थियों से सीधा संवाद करते डीआरडीओ के पूर्व संचालक डॉ काशीनाथ देवधर. इस दौरान उपस्थित डॉ वाल्मीक सरवदे, डॉ फारूक खान व अन्य.

कार्यक्रम की शुरुआत में विवि में कुलाधिपति नियुक्त प्रबंधन परिषद पर नियुक्ति होने पर देवधर को सम्मानित किया गया. इस अवसर पर कॉमर्स व प्रबंधन शास्त्र विद्या संकाय के अधिष्ठाता डॉ वाल्मीक सरवदे, विभाग संचालक डॉ फारूक खान, डॉ अभिजीत शेलके, प्रा राम कलानी, डॉ यशवंत वायकर, डॉ श्वेता पाटील, शोधार्थी स्नेहल उमाटे, आनंद शिरसाठ, अना खान, सैयद मुनव्वर सहित बड़ी संख्या में विद्यार्थीगण उपस्थित थे. कार्यक्रम का संचालन ज्ञानेश्वर गिरी ने किया, आभार डॉ सोनाली क्षीरसागर ने माना.

बुधवार ११ जानेवारी २०२३

# युवा-शिक्षण-रोजगार



पुण्यातील डीआरडीओचे निवृत्त संचालक तथा गन एक्स्पर्ट देवधर यांचे मत

## डॉ. कलामांनी वाढवला आत्मविश्वास

प्रतिनिधी | औरंगाबाद

डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी भारतीयांची मान जगात संरक्षण क्षेत्रात उंचावेल, अशी कामगिरी केली आहे. प्रत्येक भारतीयाला महासत्तेचे स्वप्न दाखवून त्यांनी आत्मविश्वास वाढवला, असे मत 'डीआरडीओ'चे निवृत्त संचालक तथा गन एक्स्पर्ट काशीनाथ देवधर यांनी व्यक्त केले. विद्यापीठातील व्यवस्थापनशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला. त्या वेळी ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता तथा व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. वाल्मीक सरवदे होते. विभागाचे संचालक डॉ. फारुख खान यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी देवधर यांचा कुलपती तथा राज्यपाल नामनिर्देशित व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार केला.

देवधर म्हणाले, 'ज्या वेळी कारगिल युद्ध झाले त्या वेळी त्यांच्या टीमचे नेतृत्व तत्कालीन राष्ट्रपती डॉ. कलाम यांनी केले. त्यांच्यासोबत मला काम करण्याची संधी मिळाली ती मोलाची होती. आपल्या सहकाऱ्यांवर विश्वास कसा ठेवायचा, याचे डॉ. कलाम आदर्श उदाहरण आहे. त्यांचे संवाद कौशल्य अद्वितीय होते. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात ११ मे १९९८ रोजी अणुचाचण्यांनंतर आपल्या देशाचा नावलौकिक झाला. भारतीय जवान जी बझुका नावाची गन वापरतात तिचे सुरुवातीला २६ किलो वजन होते, ते कमी करून १४ किलो करण्याचे काम 'गन एक्स्पर्ट' म्हणून आपण केल्याचे त्यांनी सांगितले. ज्ञानेश्वर गिरी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सोनाली श्रीरसागर यांनी आभार मानले. डॉ. अभिजित शेळके, प्रा. राम कलानी, डॉ. यशवंत वायकर, डॉ. श्वेता पाटील यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी विभागातील संशोधक विद्यार्थी स्नेहल उमाटे, आनंद शिरसाठ, अना खान, सय्यद मुनावर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास एमबीए आणि एमसीएचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




देवधर यांनी व्यवस्थापनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

# प्रेसनोट

दिनांक २०/०१/२०२३

## व्यवस्थापनशास्त्र विभागात जे.एल.एल या नामांकित आय टी टेक्नॉलॉजी चा कॅम्पस ड्राईव्ह



डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथील व्यवस्थापनशास्त्र विभागात आज जे.एल.एल या नामांकित आय टी टेक्नॉलॉजी कॅम्पस ड्राईव्ह चा कार्यक्रम झाला. या मध्ये नेहा पाटील आणि युगंधरा पाटील यांनी सूत्रसंचलन केले. त्यानंतर जे.एल.एल टेक्नॉलॉजी च्या टीम एच आर उज्वला जाधव यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी व्यवस्थापनशास्त्र विभागाचे संचालक डॉ.मोहमद फारुख खान,व्यवस्थापनशास्त्र विभागाच्या नियुक्ती समन्वयक डॉ.सुचेता यंबल,डॉ.अभिजित शेळके,डॉ.कावेरी लाड,डॉ.श्वेता पाटील, श्री.राम कलानी, श्री.ज्ञानेश्वर गिरी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे औरंगाबाद येथील नियुक्ती अधिकारी डॉ.गिरीश काळे , हे उपस्थित होते. त्यानंतर जे.एल.एल टेक्नॉलॉजी चे अभिषेक जैस्वाल,अविनाश मासुळे,अंकिता जैस्वाल,उज्वला जाधव,अमोल न्यायधीश,प्रणव माळी यानी कॅम्पस बद्दल माहिती दिली. कॅम्पससाठी व्यवस्थापनशास्त्र विभागातील विद्यार्थी,संगणक विभागातील विद्यार्थी विवेकानंद कॉलेज,देवगिरी कॉलेज येथील विद्यार्थ्याने मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला.सेनजीत साळुंके,मोहंमद शहाबाज व समीक्षा बारी यांनी परिश्रम घेतले.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad * P.R.O. No.......... 20/01/2023

Department of Management Science * Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad

संचालक

डॉ.मोहमद फारुख खान

ठाकरे गटाचा जोर प्रतिनिधी सभेवरच, शिंदेसेनेने दामटले लोकप्रतिनिधींचे घोडे; सामना अनिर्णीत ... आतील पानात

# दिव्य मराठी

औरंगाबाद

शनिवार 21 - जानेवारी 2023

दिव्य मराठी विशेष • जे. एल. एल. आयटी कंपनीच्या परिसर मुलाखतीत १०० पेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी


# विद्यापीठ कॅम्पस, ६ जणांना प्रत्येकी ३.५ लाखांचे पॅकेज

प्रतिनिधी | औरंगाबाद

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांसाठी शुक्रवारी परिसर मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जे. एल. एल. या प्रसिद्ध इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी कंपनीने सहभाग घेतला. विभागातील एमसीएच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. त्यापैकी सहा जणांची प्राथमिक निवड केली आहे. त्यांना आता ३.५ लाखांचे पॅकेज दिले जाणार आहे. यात १०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

व्यवस्थापनशास्त्र विभागातून उत्तीर्ण झालेले शंभर टक्के विद्यार्थ्यांना नोकरी मिळते. शिवाय विविध वेळी आयोजित केलेल्या परिसर मुलाखतीतही विभागातील विद्यार्थ्यांची निवड केली जाते. शुक्रवारी विद्यापीठाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या वतीने परिसर मुलाखती आयोजित केल्या होत्या.

विभागाचे संचालक डॉ. फारुख खान यांची या वेळी प्रमुख उपस्थिती होती. जेएलएल कंपनीच्या एचआर विभागाच्या उज्ज्वला जाधव यांनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांच्या समवेत अभिषेक जैस्वाल, अविनाश मासुळे, अंकिता जैस्वाल, अमोल न्यायधीश, प्रणव माळी यांनीही विद्यार्थ्यांशी संवाद साधला. डॉ. सुचेता यंबल, डॉ. अभिजित शेळके, डॉ. कावेरी लाड, डॉ. श्वेता पाटील, राम कलानी, ज्ञानेश्वर गिरी यांची प्रमुख उपस्थिती होती. व्यवस्थापनशास्त्र विभागासह संगणक व माहिती तंत्रशास्त्र विभाग, विवेकानंद कॉलेज, देवगिरी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीही सहभाग नोंदवला. प्रसेनजित साळुंके, मोहंमद शहावाज, समीक्षा बारी यांनी परिसर मुलाखत यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. नेहा पाटील, युगंधरा पाटील यांनी सूत्रसंचालन केले.



डॉ. फारुख खान यांच्या मार्गदर्शनात व्यवस्थापनशास्त्र विभागात परिसर मुलाखती आयोजित केल्या होत्या.

# प्रेस नोट

दिनांक ०९/०१/२०२३

प्रेस नोट

## 'गन एक्स्पर्ट काशीनाथ देवधर' यांचा विद्यार्थ्यांशी संवाद

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद येथील व्यवस्थापनशास्त्र विभागात आज 'गन एक्स्पर्ट काशीनाथ देवधर' यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.कार्यक्रमाची सुरवात करताना ज्ञानेश्वर गिरी यांनी सुत्रसंचलन करून काशीनाथ देवधर सर यांचा अल्प परिचय दिला.मार्गदर्शन करताना काशीनाथ देवधर सर म्हणाले, ज्या वेळी कारगिल युद्ध झाले त्या वेळी त्यांच्या टीम चे नेतृत्व भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी केले, त्यांच्या सोबत त्यांना जी काम करण्याची संधी मिळाली ती मोलाची होती, आपल्या सहका-यावर विश्वास कसा ठेवायचा हे ते डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या संवादातून शिकले. तसेच ११ मे १९९८ रोजी ज्या अनु चाचण्या झाल्या त्यानंतर आपल्या भारत देशाला कशी नावलौकिकता भेटली हे त्यांनी सांगितलं,तसेच आपले भारतीय जवान जी बजुका नावाची गन वापरतात त्याच सुरवातीला वजन हे २६ किलो होते ते कमी करून १४ किलो करण्याचं काम गन एक्स्पर्ट काशीनाथ देवधर आणि त्यांचा टीमने केले व त्यांच्या जीवनातले काही प्रसंग त्यांनी सांगितले, यावेळी विद्यापीठाचे व्यवस्थापनशास्त्र विभागाचे अधिष्ठाता डॉ.वाल्मिक सरवदे यांनी आणि विभागप्रमुख डॉ.फारुख खान यांनी गन एक्स्पर्ट काशीनाथ देवधर यांचा सत्कार केला सोबत डॉ.अभिजित शेळके,सहायक प्राध्यापक राम कलानी,डॉ.यशवंत वायकर,डॉ.स्वेता पाटील,डॉ.सोनाली श्रीरसागर होते आणि ज्ञानेश्वर गिरी यांनी काशीनाथ देवधर सर यांचा पूर्ण परिचय दिला आणि सुत्रसंचलन केले,या नंतर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर गिरी यांनी केले. तसेच कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी विभागातील संशोधक विद्यार्थी स्नेहल उमाटे,आनंद शिरसाठ,अना खान,सैयद मुनावर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमात एमबीए आणि एमसीए प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

Director
Department of Management Science
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Aurangabad-431004, Maharashtra

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad
P.R.O.
No.
9/01/2023
Time 6:15